# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

# Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

## प्रेस नोट

### महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास देशातील सर्वोत्कृष्ट जलसंपत्ती नियमन प्राधिकरण म्हणून राष्ट्रीय जलपुरस्कार २०१९ घोषित.

केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयातर्फे देण्यात येणारे राष्ट्रीय जल पुरस्कार घोषित करण्यात आले असून सन २०१९ साठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास देशातील सर्वोत्कृष्ट जलसंपत्ती नियमन प्राधिकरण म्हणून सलग दुसऱ्यांदा पुरस्कार देण्यात आला आहे. अशी माहिती महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे सदस्य (विधी) आणि प्राधिकरणाचे जनसंवाद प्रमुख बॅरि. श्री. विनोद तिवारी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

पुरस्कार वितरण सोहळा पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी, केंद्रीय जलशक्ती मंत्री श्री. गजेंद्रसिंग शेखावत यांच्या हस्ते दिनांक ११.११.२०२०/१२.११.२०२० रोजी Virtual सोहळ्याद्वारे होईल. “महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण” या महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त व वैधानिक प्राधिकरणास केंद्र सरकारकडून जल नियमन क्षेत्रातील **"सर्वोत्कृष्ट नियमन प्राधिकरणाचा"** राष्ट्रीय पुरस्कार जलशक्ती मंत्रालयाकडून सलग दुसऱ्यांदा देण्यात आला. सदर पुरस्कारासाठी सन २०१९ मध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या वतीने तत्कालीन अध्यक्ष श्री. के. पी. बक्षी (सध्या निवृत्त), तत्कालीन सदस्य (अभियांत्रिकी) श्री. विनय कुलकर्णी (सध्या निवृत्त) , विद्यमान सदस्य (विधी) बॅरि. श्री. विनोद तिवारी, विद्यमान सदस्य (अर्थ) डॉ. एस. टी. सांगळे यांच्या कारकिर्दीत जल नियमन क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कामासाठी हा पूरस्कार देण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या वतीने सदस्य (विधी) बॅरि. श्री. विनोद तिवारी यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयात सादरीकरण केले.

राज्यातील उपलब्ध जलसंपत्तीचे न्यायोचित, समन्यायी व टिकाऊ वितरण व व्यवस्थापन यासाठी "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा, २००५" अन्वये महाराष्ट्रात जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापन झालेले आहे. राज्यातील भू-पृष्ठावरील उपलब्ध जलसंपत्तीचे तसेच भू-जलाचे हे प्राधिकरण नियमन करते, प्राधिकरणाने स्वायत्तपणे जनहितार्थ घेतलेले निर्णय व त्यांच्या अंमलबजावणीने जलक्षेत्रात झालेला सकारात्मक परिणाम, अधिनियमाने विहित केलेल्या जबाबदा-यांची अंमलबजावणी, पाण्याचा काटेकोर वापर, जल प्रदूषणावर नियंत्रण, सांडपाण्याचा पुनर्वापर यासाठी केलेली जनजागृती यांचा सर्वकष विचार करुन केंद्र शासनाने देशातील **"सर्वोकृष्ट जल नियमन प्राधिकरण"** या संवर्गातील प्रथम पुरस्कारासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची सलग दुसऱ्यांदा निवड केली आहे. सातत्याने दुसऱ्यांदा प्रथम पुरस्कार मिळवणारे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण हे **देशातील पहिलेच प्राधिकरण** ठरले आहे.

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005.
Tel.: +91-22-2215 2019, Email : mwrra@mwrra.in I Website : www.mwrra.org

प्राधिकरणाने विविध क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य जलक्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणत असून पाण्याचा काट कसरीले वापर, पुर्नउपयोग, सांडपाणी व्यवस्थापन व जलपूनर्भरण या क्षेत्रात महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे.

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने पाण्याच्या अधिकाराला जीवन जगण्याचा मूलभूत - मौलिक अधिकार म्हणून संवैधानिक मान्यता असल्याचे स्पष्ट केल्यानंतर महाराष्ट्रातील प्राधिरणाने वेळोवेळी महत्त्वपूर्ण आदेश पारित केले आहेत.

जलसंपत्ती नियमन क्षेत्रात, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या पुढील उल्लेखनीय कामांची विशेष दखल घेतलेली आहे :

- विविध पाणी वापरकर्ते, अशासकीय संस्था, जलक्षेत्रातील तज्ञ यांचेशी सततचा विचारविनियम करुन प्राधिकरणाने घेतलेले पारदर्शी व जनहिताचे निर्णय.
- प्राधिकरणाकडे येणा-या पाणी तंटयांचा केलेला न्यायिक व जलदगतीले निपटारा, त्यामुळे पाणी वापरकर्त्यांमध्ये प्राधिकरण कामाबाबत निर्माण झालेले विश्वासाचे वातावरण.
- प्राधिकरणाने सिंचन व बिगर सिंचन पाणीहक्क वितरणासाठी तयार केलेले निकष व त्याची प्रभावी अंमलबजावणी.
- पाणी वापरकर्त्यांची आर्थिक क्षमता, पाणी उपलब्धतेची शाश्वती व पाणी वापरकर्त्यांकडून होणारे प्रदूषण या घटकांच्या आधारे प्राधिरणाने तयार केलेले पाणीपट्टीचे दर.
- पाणी वापराच्या प्रमाणात तयार केलेले घरगुती व औद्योगिक पाणीपट्टीची दर.
- पाणी नाश थांबविणे व पाण्याचा कार्यक्षम वापर यासाठी तयार केलेले विविध नियम, यासाठीच्या प्रोत्साहत्मक व दंडनीय तरतुदी व त्याची काटेकोर अंमलबजावणी.
- नागरी सांडपाण्यावर प्रक्रिया व त्याच्या पुनर्वापरासाठी घेतलेली आग्रही भूमिका.
- उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटपासाठी दिलेले विविध आदेश.

केंद्र सरकारने आपल्या राज्याच्या जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास सर्वोत्कृष्ट प्राधिकरण म्हणून सन्मान केल्याने, प्राधिकरणाचे कार्य, महत्व आणि आवश्यकता याची प्रचिती इतरही सर्व राज्यांना होईल, असा विश्वास प्राधिकरणाच्या वतीने सदस्य (विधी) बॅरि. श्री. विनोद तिवारी आणि सदस्य (अर्थ) डॉ. शिवाजी सांगळे यांनी व्यक्त केला असून केंद्र सरकारचे आभार मानले आहे.

06/11/2020

डॉ. शिवाजी सांगळे
सदस्य (अर्थव्यवस्था)

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

06/11/2020

बॅरि. श्री. विनोद तिवारी
सदस्य (विधी)